जावक क्रमांक ९२५ सन २०१२
जिल्हा सरकारी वकील, सातारा
यांचे कार्यालय.
दिनांक ०१/१२/२०१२

प्रति,

मा. कार्यासन अधिकारी,
विधी व न्याय विभाग—का.२१
मंत्रालय,
मुंबई—३२

**विषय :— नागरिकांची सनद प्रसिध्द करणेबाबत.....**
संदर्भ :— आपले पत्र क्रमांक संकीर्ण—२०१२/१३०५/प्र.क्र.९९
का.२१, दिनांक १६ नोव्हेंबर २०१२

विधी व न्याय विभाग
आवक क्रमांक ९८४०/१२
दिनांक 10/12/12

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये कळविण्यात येते की, या कार्यालयामार्फत नागरिकांची सनद तयार करून प्रसिध्द केलेली आहे. सोबत सदर नागरिकांच्या सनदेची प्रत आपले माहितीसाठी जोडलेली आहे. तसेच आपले संदर्भीत पत्रात नमूद केलेल्या ई-मेलवर swapnilkapadnis77@gmail.co पाठविण्यात आलेली आहे.

कळावे,

आपला विश्वासू
(विकास पाटील)
जिल्हा सरकारी वकील व
सरकारी अभियोक्ता सातारा

सोबत — नागरिकांची सनदेची प्रत.

# नागरीकांची सनद (Citizen Charter)

## जिल्हा सरकारी वकील, सातारा यांचे कार्यालय

---

### १. जिल्हा सरकारी वकील कार्यालयाची रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

जिल्हा सरकारी वकील कार्यालय हे विधी व न्याय विभाग मंत्रालय मुबंई यांचे अधिपत्याखाली स्थापन झाले आहे त्यांच्या वतीने या कार्यालयाचे कामकाज चालते या कार्यालयातर्फे जिल्हा व सत्र न्यायालय व त्यांचे अभिपत्या खाली असलेली अति.जिल्हा व सत्र न्यायालये व दिवाणी न्यायालये व स्तर सातारा वडूज व कराड यांचे न्यायालयात दाखल होणारी कामे शासनाचे वतीने या कार्यालयाकडून पाहिली जातात.

कार्ये — या कार्यालयात सातारा जिल्हयामध्ये शासना विरुदध अथवा शासनाचे नुकसान होत असल्यास शासनाचे बाजूने मे. कोर्टात दिवाणी व फौजदारी कामात शासनाची बाजू मांडणेचा अधिकार आहे .

कर्तव्ये — दिवाणी व फौजदारी प्रकरणात शासनाची बाजू मे. कोर्टात भक्कमपणे मांडणे

### 2- जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये

जिल्हा सरकारी वकील व सहा.जिल्हा सरकारी वकील यांनी जिल्हयातील जिल्हा न्यायालये व दिवाणी न्यायालये व स्तर यांचे समोर शासनाचे वतीने हजर होवून शासनाची बाजू मांडणेचा अधिकार आहे व जिल्हा सरकारी वकील सातारा यांचे कार्यालयातील संबधीत सर्व कागदपत्र संभाळणेचा अधिकार कार्यालयात नेमूण दिलेल्या कर्मचारी यांचेकडे असतो .

अधिका—यांचा कर्तव्ये —जिल्हयातील न्यायालयात शासनाची बाजू भक्कम पणे मांडणे

कर्मचा—यांची कर्तव्ये —शासनाचे वतीने विविध शासकिय कार्यालयाकडून न्यायालयातील प्रकरणांशी निगडीत असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेवून जिल्हा सरकारी वकील व सहा.जिल्हा सरकारी वकील यांना शासनाचे बाजूने कामे चालवणेस सहकार्य करणे

३. **निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपदधती , तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली**

जिल्हा सरकारी वकील कार्यालयाचे प्रमुख म्हणून जिल्हा सरकारी वकील हे असतात व ते कार्यालय प्रमुख या नात्याने सर्व निर्णय घेतात व त्यानुसार सर्व सहा. जिल्हा सरकारी वकील व कार्यालयीन कर्मचारी यांनी काम पाहणेबाबत सुचीत करीत असतात.

४. **स्वता:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविणेत आलेली मानके**

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुबंई यांनी नियुक्ती दिलेल्या जिल्हा सरकारी वकीलानां व त्यांचे सहा.जिल्हा सरकारी वकील यांना ठराविक कालावधी नेमूण देण्यात आलेला असतो व त्या नेमून देण्यात आलेल्या कालावधी मध्ये शासनाकडून दाखल होणारी प्रकरणे व शासना विरुदध प्रलंबित असणारी न्यायालयीन प्रकरणाचा जलद रितीने निपटारा करणेचा असतो .

५. **त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम , विनियम सूचना नियमपुस्तिका आणि अभिलेख**

न्यायालयीन कामकाजा संबधी या कार्यालयाचे कामकाज असलेने दिवाणी व फौजदारी प्रक्रिया संहिता व म्यॅनुअल्स नुसार काम चालते त्या नुंसारच या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना काम चालवावे लागते

६. **आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबधात, लोकांशी विचारविनियम करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील**

न्यायप्रविष्ठ न्यायालयीन कामकाजा मध्ये संबंधीत खात्याच्या अधिकारी / कर्मचारी यांचेशी विचार विनीमय केला जातो व सरकार पक्षाची बाजू त्यांचे पश्चात मांडण्यासाठी त्यांना न्यायालयात बोलवले जाते.

७. **आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तीच्या मिळून बनलेल्या मंडळांचे ,परिषदांचे समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण आणि त्या मंडळांच्या परिषदांच्या समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृते जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण**

जिल्हासरकारी वकील कार्यालयात शासनाचे वतीने न्यायालयीन प्रकरणांत उपस्थित राहणा–या प्रतिनिधीना संबधीत न्यायालयातील प्रकरणांची माहिती व परिस्थिती समजावून सांगितली जाते कायदयाचे पालनकर्ते म्हणून कायदेशीर सल्ला दिला जातो . जिल्हा सरकारी वकील यांची कार्यालयाची माहिती जनतेला माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केलेस (न्यायप्रविष्ठबाबी, गोपनीय कागदपत्रे व न्यायालयीन कामकाजावर परिणाम करणारी कागदपत्रे इत्यादी सोडून) कायदेशीर आकारणी करुन पहावयास दिली जाते .

**८. आपले अधिका–यांची आणि कर्मचा–यांची निर्देशिका**

अपीलीय अधिकारी — श्री.विकास बाबूराव पाटील, जिल्हा सरकारी वकील सातारा

जिल्हा जन माहिती अधिकारी — श्री. शामप्रसाद वसंतराव बेगमपुरे सहा.जिल्हा सरकारी वकील सातारा

इतर एकूण ९ सहा.जिल्हा सरकारी वकील खालील प्रमाणे

१. श्री.सदाशिव नानासाहेब सानप
२. श्री. शामप्रसाद वसंतराव बेगमपूरे
३. श्री. महेश नारायण कुलकर्णी
४. श्रीमती पुनम चंद्रशेखर इनामदार
५. श्रीमती सरोज संजय जाधव
६. श्रीमती जिलशाद तय्यूब मुल्ला
७. श्री.किशेर पांडुरंग कदम
८. श्री. प्रमोद शंकरराव शिंदे
९. श्री. नितीन दिनकरराव मुके

कर्मचारी — एक वरिष्ठ लिपीक ,चार कनिष्ठ लिपीक एक लघूलेखक तथा क्लार्क, एक लघूलेखक एक शिपाई

**९. आपल्या प्रत्येक अधिका–याला व कर्मचा–यांला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनिमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पदधती**

जिल्हा सरकारी वकील व अतिरीक्त सरकारी वकील यांना यांना शासनाचे वतीने अनुज्ञेय असणारे मानधन दिले जाते. कर्मचारी यांच्या नेमणूका जिल्हा न्यायालयाकडून केल्या जात असलेने त्यांना जिल्हा न्यायालयातर्फे मासीक वेतन दिले जाते

या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना शासन नियमानुसार मानधन व वेतन देण्यात येत असलेमुळे नुकसान भरपाई देण्याची पदधती नाही .

**१०. सर्वयोजनांचा तपशील ,प्रस्तावित खर्च दर्शविणारा आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल**

जिल्हा सरकारी वकील कार्यालया मार्फत न्यायदानास मदत करणेचे कार्य चालत असलेने कुठलिही योजना या कार्यालयामार्फत राबिवली जात नाही. या कार्यालयामार्फत कुठलाही प्रस्तावीत खर्च केला जात नाही .

**११ अर्थसाहाय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिका—यांचा तपशील**

जिल्हा सरकारी वकील कार्यालयामार्फत कुठलेही अर्थसहाय केले जात नाही शासनाच्या वतीने शासनाकडून दाखल होणा—या व शासनाविरुदध चालविल्या जाणा—या न्यायालयातील प्रकरणातील न्यायदानास सहकार्य केले जाते .

**१२ ज्या व्यक्तिीना सवलती , परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तीचा तपशील .**

जिल्हा सरकारी वकील कार्यालयात कुठलिही सवलत अथवा परवाने किंवा प्राधिकार पत्रे दिली जात नाहीत.

**१३. विहित करण्यात येईल अशी इतर माहिती**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय सातारा या कार्यालयात जिल्हयातील शासकीय कार्यालयाचे वतीने न्यायालयापुढे कामकाज चालवले जाते न्यायालयात दाखल होणा—या आणि शासना विरुदध प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू न्यायालयासमोर मांडून न्यायदानाचे काम पाहिले जाते तसेच शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या शासकिय कार्यालयाना या कार्यालयाकडून कायदेशीर सल्ला पुरविला जातो .

सातारा

(विकास बा.पाटील)
जिल्हा सरकारी वकील व
सरकारी अभियोक्ता,सातारा